महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद
(विद्या परिषद)

इयत्ता : पाचवी

---

# लेखन : स्व-अभिव्यक्ती

**अनुभव लेखन**

१) तुला कुणाजवळ आपली चूक कबूल करावीशी वाटते? का? चूक झाल्यावर तू ती मान्य कशी करशील? सविस्तर लिही.

२) शिक्षकांनी तुला फळ्यावर दिवाळीच्या सर्व शाळेसाठी शुभेच्छा लिहायला सांगितल्या आहेत. तुझ्या भाषेत तू त्या लिही.
[इथं फक्त ' शुभ दीपावली' एवढंच अपेक्षित नाही. मुलांनी किमान चार ते पाच ओळीत आपल्या भावना लिहिणे अपेक्षित आहे.]

३) आई जेव्हा खूपच चिडते तेव्हा काय करते? ती शांत कशी होते? तुझा अनुभव लिही.

४) पाचवीच्या वर्गात तुझा पहिला दिवस कसा होता? तुझा अनुभव लिही.

५) खरं बोलण्याच्या फायदे आणि तोट्यांची यादी कर. प्रत्येकी तीन मुद्दे लिही.

६) शाळेतील मित्रांबरोबर/मैत्रिणींबरोबर बोलताना-खेळताना-जेवताना गमतीजमती होत असतात. तूही अशा गमती जमती पहिल्या असशील. अशीच एखादी धम्माल गंमत लिहून काढ

७) तुझा दिनक्रम कसा आहे ते लिही.

८) शिक्षकांना कधी राग येतो? पाच गोष्टींची यादी कर.

९) तू कधीच करणार नाहीस अशा पाच गोष्टींची यादी कर.

१०) दिलेल्या विषयावर थोडक्यात अनुभव लिही.
   a) आली थंडी
   b) कडक उन्हाळा
   c) पोहण्याची मजा

मुलांच्या दैनंदिन जीवनातील विषय निवडून त्यांना लेखनासाठी द्यावा.

११) एखद्या वस्तूचे भिन्न भिन्न उपयोग लिही

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद
(विद्या परिषद)
इयत्ता : पाचवी

---

**काल्पनेवर आधारित लेखन**

१) तुझ्या बाबांनी कधी स्वैपाक केला तर त्या दिवशी काय काय घडेल ते थोडक्यात लिही.
२) दोन डायनासोरस ही पात्रे घेऊन एक काल्पनिक कथा तयार कर.
३) फाटलेलं पुस्तक तुझ्याशी बोलतंय अशी कल्पना करून सात ते आठ ओळी लिही.
४) आई घरी नाही आणि तुझ्या हातून बाजरी सांडली; तर तू काय करशील ?
५) आई घरी नाही आणि दूध उतू गेलं; तर तू काय करशील?
६) मित्राने छोटी चोरी केली आहे, तुला माहीत आहे. तर तू काय करशील?
७) गावातल्या संध्याकाळचे वर्णन तुझ्याशब्दांत लिही.
८) पऊस कमी झाल्याने उगवलेली रोपे सुकून गेली. हे समजल्यावर तुला काय वाटले? पाच ते सात वाक्यांत लिही.

**जाहिरात**

तुमच्या वर्गाने केलेल्या कागदी फुलांची जाहिरात तयार कर.

**पत्रलेखन**

१) तुझ्या बाईंना आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला आहे .त्यांचं अभिनंदन करणारं पत्र लिही.
२) तू वाचलेलं पुस्तक तुला खूप आवडलं हे सांगणारं पत्र त्या पुस्तकाच्या लेखकाला लिही.
३) अचानक आजारी पडल्याने तुला शाळेत जाता येणार नाही. मित्राच्या हाती शिक्षकांच्या नावे शाळेत येऊ शकत नसल्याचे पत्र लिहून पाठवायचे आहे असे पत्र तयार कर .

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्‌या परिषद)

इयत्ता : पाचवी

---

**प्रसंगवर्णन**

तुझ्या घरी होळी/शिमगा सण कसा साजरा करतात ते लिही.

**विषयाशी जोडलेले शब्द**

१) खालील विषयाचे वर्णन करणारे पाच शब्द लिही.
   उदा. आमावस्येची रात्र -काळीकुट्ट, भीतीदायक, चांदण्या, गडद, शांत
   अ. पावसातला चिखल
   आ. घरातला पसारा
२) एकेका शब्दाने वाक्य वाढवून लिही.
   अशी तीन वाक्ये बनव.
   उदा.घरी जा --- लवकर घरी जा - तू लवकर घरी जा.
   अ. आई आली.
   आ. तो पडला.
   इ. आवाज आला.

**वैचारिक लेखन**

तुझ्या वर्गात कोणाकोणाचे फोटो आहेत? ते वर्गात का लावलेले आहेत? तुला काय वाटतं ते लिही.

**शब्दांवरून गोष्ट**

रंग- भांडण-ब्रश-मैत्री या शब्दांचा वापर करून तुला आवडेल अशी गोष्ट तयार कर.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्या परिषद)

इयत्ता : पाचवी

---

**संवाद लेखन**

१) शाळा तुझ्याशी बोलते आहे अशी कल्पना करून संवाद लिही.

२) सुई आणि दोरा या दोन वस्तू एकमेकांशी बोलत आहेत अशी कल्पना करून त्यांच्यातील संवाद लिही.

३) पोळपाट आणि लाटणे या दोन वस्तू एकमेकांशी बोलत आहेत अशी कल्पना करून त्यांच्यातील संवाद लिही.

**व्यक्तिचित्रलेखनाची पूर्वतयारी**

१) तुझ्या आवडत्या मित्राचं/मैत्रिणीचं नाव लिही. तो /ती तुला का आवडतो/आवडते ते थोडक्यात लिही.

२) तुझ्यातील कोणतेही पाच चांगले गुण लिही. तुझ्यातील तू वाटणारे कोणतेही पाच दोष लिही.